नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 31/03/2021 (बुधवार)
(सायंकाळ)

---

## खून

1) पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 02 कि. मी अंतरावरील अक्की बारसमोर, बायपास रोड, उमरेड येथे दिनांक 30/03/2021 चे 20.00 वा. ते 21.00 वा. दरम्यान आरोपी 1) महादेव बाळुजी मोहीनकर, वय 23 वर्ष व 2) विजय रविन्द्र डहारे, वय 23 वर्ष, दोन्ही रा. कावरापेठ, उमरेड यांनी संगनमत करून जुन्या वादाच्या कारणावरून संदिप उर्फ संजय इस्तारी खवास(मृतक), वय 36 वर्ष, रा. कावरापेठ, उमरेड, जि. नागपूर यास धारधार शस्त्राने गंभीर जखमी करून जागीच जिवानीशी ठार केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– रविंद्र इस्तारी खवास, वय 41 वर्ष, रा. हनुमान मंदिरजवळ, कावरापेठ, उमरेड यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 302, 34 भादंवि. सहकलम 4/25 भारतीय हत्यार कायदा अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री सोलसे पो. स्टे. उमरेड मो. क्र. 7038046399 हे करीत आहे.

2) पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 16 कि. मी अंतरावरील एन.एच.53 रोड सावळी फाटा येथे दिनांक 31/03/2021 चे 11.00 वा. पुर्वी फिर्यादी नामे– गुनाकर कवडुजी इंगोले, वय 52 वर्ष, रा.सावळी ता कामठी यांना पोलीस स्टेशन मौदा येथील कर्मचारी यांनी फोनव्दारे सावळी येथे बोलाविले होते. त्यावरून फिर्यादी यांनी घटनास्थळी जावुन पाहीले असता तेथे एक अनोळखी इसम/मृतक वय अंदाजे 30 ते 35 वर्ष याचे प्रेत जमीनीत पुरलेले दिसले. त्या प्रेतला बाहेर काढल्यानंतर त्याचे हात, पाय तसेच पुर्ण शरीर पुरलेल्या स्थितीत दिसले. तसेच प्रेताचे डोके एका प्लॉस्टीक पोत्यामध्ये टाकुन ते पोते मृतकाचे मानेभोवती गुंडाळलेल्या स्थितीत होते. ते पोते काढुन पाहिल्यानंतर मृतकचा चेहरा कुजलेल्या होता. यातील अज्ञात आरोपीने अज्ञात कारणातुन अनोळखी इसमाचा खून करून पुरावा नष्ट करण्याचे हेतुने त्याचे प्रेत घटनास्थळी जमिनीत पुरले.

सदर प्रकरणी फिर्यादीयांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 302, 201 भादंवि. कायदा अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री विजय जाधव 9870328904 हे करीत आहे.

3) पो.स्टे. बोरी :– अंतर्गत 3 कि. मी अंतरावरील बुटीबोरी ते गोसाई नगर, बोरखेडी रेल्वे शिवार येथे दिनांक 31/03/2021 चे 10.00 वा. पुर्वी फिर्यादी नामे अशोक विठ्ठलराव वंजारी वय 43 वर्ष रा. वार्ड कमांक 4 इंदीरानगर बुटटीबोरी ता.जि. नागपूर याचा चुलत लाहन भाऊ हा त्याचे बैलांना शेतातुन सोबत घेवुन पाणी पाजण्याकरीता बोरखेडी फाटक शिवार, बुटटीबोरी ते उमरेड रेल्वे लाईनचे पुलाजवळील खाली नाल्यात घेवुन गेला होता. त्यादरम्यान त्याला अनोळखी मृतक वय अंदाजे 30 ते 35 वर्ष याचे प्रेत पडुन असल्याचे दिसले. त्यावरून त्याने फिर्यादी याला सदरचे घटनेचे सबंधाने कळविल्याने त्याने घटनास्थळी जावुन पाहीले असता सदर मृतकाचे प्रेत पडलेल्या स्थीतीमध्ये दिसले. त्याने मृतकाचे प्रेताची पाहणी केली असता मृतकाला डोक्याचे मागे

मेंदुचे भागावर गंभीर स्वरूपाची जखम व त्या जखमेतुन रक्त निघत असल्याचे दिसले. त्यामुळे त्याला कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणावरून त्याचा दगडाने ठेचुन जिवानिशी ठार मारले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 302 भादंवि. कायदा अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्री माणीक चौधरी 9273237381 हे करीत आहे.

4) पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 2 कि. मी अंतरावरील मारोती कडसाईतच्या घरासमोर अर्जुननगर काटोल येथे दिनांक 31.03.21 चे 13/00 वा ते 13/30 सुमारास फिर्यादी सौ. पल्लवी प्रतीक गजबे वय 22 वर्ष रा. अर्जुननगर काटोल हि तीचे घरी हजर असतांना तिचा दिर मृतक नामे– **नितेश उर्फ गिरीश लिलाधर गजबे वय 21 वर्ष रा. अर्जुननगर काटोल** याचा व आरोपी क्रं. 1. करण गवळी याचा काही दिवसापुर्वी कोणत्यातरी कारणावरून वादविवाद झाला होता. याच कारणावरून आरोपी क्रं. 1. **करण गवळी वय 21 वर्ष व 2. अर्जुन माटे वय 21 वर्ष दोन्ही रा. काटोल यांनी** झालेल्या वादाचा राग मनात ठेवुन त्यांनी संगणमत **नितेश उर्फ गिरीश लिलाधर गजबे यास चाकुने वारकरून गंभीर जखमी करून** जिवानिशी ठार मारले. फिर्यादीचा दिर यास उपचाराकरीता ग्रामीण रू. काटोल येथे नेले असता डॉक्टरांनी मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 302, 34 भादंवि. कायदा अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोनि/आचरेकर पो.स्टे काटोल मो नं 8380072211 हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

पो.स्टे. कोंढाळी :– अंतर्गत 15 कि. मी. मौजा बाजारगाव तलाव येथे दिनांक 29/03/2021 चे 11.00 वा. दरम्यान मृतक नामे– प्रतिक तेजराम सोनटक्के, वय 15 वर्ष, रा बाजारगाव हा तलावाच्या पाण्यात अंघोळीला गेला असता तलावाचे पायऱ्या वरून त्याचा पाय घसरल्याने तलावाच्या पाण्यात तो बुडुन मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– जय तेजराम सोनटक्के वय 21 वर्ष रा बाजारगाव यांचे रिपोर्टवरुन पो. स्टे. कोंढाळी येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोहवा संदीप बेले 8888822902 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर